
जिल्हा उद्योग केंद्र,
कृषि महाविद्यालय आवार,
शिवाजीनगर, पुणे ४११००५

# १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम

# संकेतस्थळ- Websites
## अ. वापरण्याची सुलभता

https://udyamregistration.gov.in


उद्योग घटकांना सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम नोंदणीसाठी देश पातळीवर एकच संकेतस्थळ असून नोंदणी प्रक्रीया ऑनलाईन आहे.




मैत्रीद्वारे राज्यातील उद्योग/व्यवसाय संबंधित विविध विभागांच्या सेवा पुर्णता एकत्रित करण्यात आले आहेत

https://maitri.mahaonline.gov.in

**या संकेतस्थळावर शासनाचे उद्योगांसाठी आवश्यक असलेले परवाने/ अनुदाने यासाठी अर्ज करण्यात येतात**




PSI SUPPORT CHAT BOX

https://maha-cmegp.gov.in

·सदरील योजना राज्य शासनाची असून या संकेतस्थळावर सूशिक्षित बेरोजगारांना सूक्ष्म उद्योगांमध्ये उत्पादक व सेवा उद्योगांसाठी सर्व प्रक्रीया ऑनलाईन राबविण्यात येते




https://kviconline.gov.in

·सदरील योजना केंद्र शासनाची असून या संकेतस्थळावर सूशिक्षित ·बेरोजगारांना सूक्ष्म उद्योगांमध्ये उत्पादक व सेवा उद्योगांसाठी सर्व प्रक्रीया ·ऑनलाईन राबविण्यात येते







**Indicators contributing significantly to uplift India's DB 2020 ranking:**


**Construction Permits:** India's ranking on this parameter has improved from 184th in 2014 to 27th in 2019. This improvement has been mainly on the account of a decrease in the number of procedures and time taken for obtaining construction permits in India.


**Getting Electricity:** India's ranking on this parameter has improved from 137th in 2014 to 22nd in 2019. It takes just 53 days and 4 procedures for a business to get an electricity connection in India.

tri.mahaonline.gov.in/Home/EaseOfDoingBusiness



# आ) माहितीचे अद्यावतीकरण



# इ) माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीची स्वयप्रकटीकरण


- सदरील माहिती मुख्यालय स्तरावर संकलित करण्यात येते.


# ई) सुरक्षितता (Data /Cyber Security)

- उद्योग संचालनालयाचे संकेतस्थळ हे MAHA-IT यांचे मार्फत तयार करण्यात आलेले आहेत.
- संगणकीय माहितीच्या सुरक्षिततेसाठी कार्यालयातील प्रत्येक संगणक Password ने सुरक्षित करण्यात आला आहे
- Quick Heal हे सॉफटवेअर सर्व संगणकात स्थापित करण्यात आले आहेत.

# ३) लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करुन ऑनलाईन प्रसिध्द करणे

- मैत्री पोर्टलवर उपलबध आहे व कार्यालयात फलक लावण्यात आला आहे



सुचना फलक

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

(महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील तरतूदीनुसार अधिसूचित केलेल्या सेवांबाबत तपशिल)

कार्यालयाचे नांव : जिल्हा उद्योग केंद्र, पुणे

विभाग : पुणे विभाग, पुणे

| अ.क्र. | अधिसूचित सेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली काल मर्यादा | लोकसेवा पुरविण्यासाठी निर्धारित शुल्क | पदनिर्देशित प्रथम अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| ०१ | सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१९ अंतर्गत मुद्रांक शुल्क माफीचे प्रमाणपत्र | ०७ दिवस | - | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र पुणे | उद्योग सह संचालक, पुणे विभाग, पुणे | अतिरिक्त उद्योग संचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई-३२ |
| ०२ | सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१३ व २०१९ अंतर्गत पात्रता प्रमाणपत्र अदा करणे | ३० दिवस | - | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र पुणे | उद्योग सह संचालक, पुणे विभाग, पुणे | अतिरिक्त उद्योग संचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई-३२ |
| ०३ | सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१३ व २०१९ अंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदानाच्या दाव्यांची मंजुरी | १५ दिवस | - | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र पुणे | उद्योग सह संचालक, पुणे विभाग, पुणे | अतिरिक्त उद्योग संचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई-३२ |
| ०४ | खाजगी माहिती तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे | ०७ दिवस | - | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र पुणे | उद्योग सह संचालक, पुणे विभाग, पुणे | अतिरिक्त उद्योग संचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई-३२ |
| ०५ | खाजगी जैव तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे | ०७ दिवस | - | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र पुणे | उद्योग सह संचालक, पुणे विभाग, पुणे | अतिरिक्त उद्योग संचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई-३२ |
| ०६ | खाजगी जैवतंत्रज्ञान उद्यानांना इरादा पत्र देणे | १० दिवस | - | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र पुणे | उद्योग सह संचालक, पुणे विभाग, पुणे | अतिरिक्त उद्योग संचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई-३२ |
| ०७ | खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना इरादापत्र देणे | ०७ दिवस | - | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र पुणे | उद्योग सह संचालक, पुणे विभाग, पुणे | अतिरिक्त उद्योग संचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई-३२ |

तृतिय व अंतिम अपिल, राज्य सेवा हक्क आयुक्त, पुणे महसूल विभाग, पुणे-३. ३रा मजला, घोले रोड, शिवाजीनगर क्षेत्रिय कार्यालय पुणे- ४११००५.
ई मेल: crtspune[at]maharashtra[dot]gov[dot]in यांचेकडे करता येईल.


website: aaplesarkar.mahaonline.gov.in

महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र पुणे


# सुकर जीवनमान

- अ) साप्रोयो योजना

- पूर्वीची स्थिती (Before)




सद्यस्थिती (after)




- # उद्योग नोंदणीकरण

पूर्वीची स्थिती (Before)






सद्यस्थिती (After)



# 100 दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम

## स्वच्छता (cleanliness)

### अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण/मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे/जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण/जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट/जुन्या वाहनांचे निर्लेखन

| पूर्वीची स्थिती (Before) | आताची स्थिती (After) |
| --- | --- |
|  |  |

Form of Register of Dead Stock

2024-25

दि: 28/11/2024

4. HP All in one Desktop - 02 (computer)

① Ser No - 1N14500J0N

② Ser No - 1N14500J28

5. HP LaserJet Pro - 01 MFP3104 (Printer)

Ser No VNF3T02792

[illegible]

HP All in one Desktop computer व एक HP LaserJet Pro printer [illegible]


General Manager
District Industries Centre, Pune.

## CERTIFICATE FOR YEAR ENDING FORM
## 01/04/2024 TO 31/03/2025

I Certify that have inspected the register of articales of Dead Stock Maintained under Rule No.95 of the Bombay Contingent Expenditure Rule १९६५, Finance and Publication No IX and found that it has been properly kept upto date and the articles mentioned there in on page No.1 to 98 are held in Stock with exception of these mentioned below the explanation of the absence of wich is apprended and that No. Articles have been written off exccept under proper sanction, which sanction has been duly recorded in the return under signature of the Head office.

General Manager
District Industries Centre, Pune

C:\Documents and Settings\admin\Desktop\Gautam Account & EST\CR CERTIFICATE.doc



जा.क्र. २०२३३/निर्लेखीत/प्रावका/पुणे/१५
प्रादेशिक परिवहन कार्यालय,
पुणे.
दिनांक : २८/०८/१५

प्रति,
मा.महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,
पुणे.

विषय : मोटार वाहनाचे निर्लेखन करण्याबाबत.
संदर्भ : आपले पत्र दिनांक २०.०८.२०१५

महोदय,


उपरोक्त संदर्भ आणि विषयास अनुसरुन आपणांस सादर करण्यात येते की, या कार्यालयातील मोटार वाहन निरिक्षक श्री.जे.आर.उपगन्लावार यांनी आपण कळविलेल्या खाली नमुद दोन वाहनांची तपासणी केली असुन, त्यांनी दिलेल्या अहवालानुसार वाहनांचे मॉडेलची पाहणी केली असता, सदर वाहने दुरुस्त करून यापुढे उपयोगात आणणे आर्थिकदृष्ट्या व सुरक्षेच्या कारणास्तव किफायतशीर राहणार नाही. त्यामुळे सदर वाहने निर्लेखीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे. निर्लेखीत करण्याची शिफारस करण्यात आलेली वाहने व त्याचे मुल्यांकन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मोटार वाहन क्रमांक | अंदाजे निर्लेखन किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | एमएच-०१एम-६६३ | ३५०००/- (पस्तीस हजार) |
| २ | एमएच-०१एस-५४६९ | ५००००/- (पन्नास हजार) |

Regional Transport Office 2 Pune

प्रादेशिक परिवहन अधिकारी
पुणे.करिता.

२६५२
२७/८/१५



GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र शासन
DIRECTORATE OF INDUSTRIES /
OFFICE OF THE GENERAL MANAGER, DISTRICT INDUSTRIES CENTRE, PUNE
उद्योग संचालनालय / महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे

जा.क/जिउके/पुणे/वाहन निर्लेखन/2025/ 334 — दि.07/08/2025

प्रति,
मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी,
ओल्ड बॉडीगार्ड लेन, तुळशीवाडी, ताडदेव,
मुंबई-400034.

विषय :- ऑनलाईन पोर्टलवर वाहन नोंदणी करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे या शासकीय कार्यालयाकडे 15 वर्षे पुर्ण झालेली दोन निर्लेखित केलेली वाहने आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.


| अ.क्र | वाहन क्रमांक | चेशीज क्रमांक |
|---|---|---|
| 1 | MH-01 S-5469 | Model-CDR-750DPHT-2WD-106-AYER<br>CHASSIS NO. CDR-750DPHT-2DU-06464<br>ENGINE NO.DU-06464<br>SERIAL NO. 1517346 |
| 2 | MH-01-M-663 | Model-MM-540DP92WD<br>CHASSIS NO. DR-2148<br>ENGINE NO.DR-0214806464<br>SERIAL NO. 432304 |

सोबत वाहनाचे पेन्सीलचे पेपरवरील रेखीत चेशीज क्रमांक व फोटो जोडले आहेत. कृपया सदरील वाहने पोर्टलवर ऑनलाईन करुन मिळावेत जेणेकरुन वाहन निष्कासन सुविधेमार्फत निर्लेखन करण्यात सुकर होईल. कृपया सदरील दोन्ही वाहनांची नोंदणी ऑनलाईन पोर्टलवर करुन मिळावी. ही विनंती.

आपला विश्वासू,
महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र, पुणे

प्रत माहितीसाठी :-
1. मा. उद्योग सहसंचालक, पुणे विभाग, पुणे

कृषि महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे 411005.
Agriculture college campus, Shivajinagar, Pune - 411 005. (Maharashtra)
दुरध्वनी क. २५५३७९६६ /२५५३७५४१ E-mail: didic.pune@maharashtra.gov.in /web : www.di.maharashtra.gov.in



दिनांक ०७/०४/२०२५

सादर,

विषय- कालबाहय अभिलेखे नस्ट/विल्लेवाट लावण्या बाबत.

महोदय,

जिल्हा उद्योग केंद्र, पुणे या कार्यालयातील खालील कालबाहय अभिलेखे नष्ट/विल्हेवाट लावावी असे वाटते करिता आपल्या मान्यतेस्तव सादर.

१. सन २०१५ ते सन २०२४ या वर्षाचे किरकोळ रजेचे अर्ज
२. लेखा शाखेतील अनुपयोगी कोरे फॉर्म
३. आस्थापना शाखेतील अनुपयोगी कोरे फॉर्म

07/04/2025


व्यवस्थापक


07/04/2025
महाव्यवस्थापक



# तक्रार निवारण

- आपले सरकार व पी जी पोर्टलवरील तक्रांरींचे निराकरण, अभयागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळाबाबत प्रसिध्दी



# कार्यालयातील सोईसुविधा

पुर्वीचीस्थिती (before)




- आताची स्थिती (After)



पूर्वीची स्थिती (Before)




आताची स्थिती (After)



पूर्वीची स्थिती (Before)



आताची स्थिती (After)




- पूर्वीची स्थिती (Before)

सद्यस्थिती (Before)







| घटक | पूर्वीची स्थिती (Before) | आताची स्थिती (After) |
|---|---|---|
| कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था |  |  |
| कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था |  |  |
| अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था |  |  |
| कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे |  |  |
| कार्यालयाचे सौंदर्गीकरण |  |  |

# 100 दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम

## ६. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Field Visit)

जिल्हयातील मोठे, विशाल व अतिविशाल उद्योग घटकांना भेटी व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांअंतर्गत विविध ठिकाणी मेळावे आयोजीत करण्यात आलेले आहेत




















# मोठे, विशाल व अति विशाल घटकांना भेटी









# जिल्हयातील औद्योगिक क्लस्टर- रेडिमेड गारमेंट क्लस्टर, जुन्नर












# ई ऑफिस प्रणाली

- ई-ऑफीस प्रणालीत ४ किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करण्यात येतो

उद्योग निरीक्षक

व्यवस्थापक

महाव्यवस्थापक

# ८. आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन

पुणे जिल्हयामध्ये आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्याकरिता दि.12/03/2025 रोजी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद MCCIA हॉल, 5 वा मजला, पुणे येथे आयोजीत केला होती. सदरील गुंतवणुक परिषदेमध्ये एकूण 172 उद्योग घटकांचे सामंजस्य करार करण्यात आले असून त्यामध्ये एकूण रक्कम रु. 7013.68 कोटी इतके रुपयाची गुंतवणुक प्रस्तावीत करण्यात आलेली असून त्यामध्ये 45306 इतके रोजगार निर्मिती होणार आहेत.





## सात हजार कोटींची गुंतवणूक

### औद्योगिक गुंतवणूक परिषदेत १७२ करार; ४५ हजार रोजगार निर्माण होणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे जिल्ह्यात सात हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, विविध कंपन्यांशी १७२ करार करण्यात आले आहेत. या माध्यमातून ४५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

औद्योगिक संघटना, सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम, मोठे उद्योजक, बँकर यांच्या औद्योगिक गुंतवणूक परिषदेत बुधवारी हे करार करण्यात आले. विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, महाराष्ट्र सेंटर फॉर आंत्रप्रेन्युरशिप डेव्हलपमेंटचे कार्यकारी संचालक विक्रांत बगाडे, पोस्ट मास्तर जनरल आर. सी. जायभाय, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे महासंचालक प्रशांत गिरबने, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी यांच्यासह विविध उद्योजक या वेळी उपस्थित होते. या परिषदेमध्ये पुण्यातून सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम आणि मोठे उद्योजक यांनी गुंतवणूक करण्याकरिता पुढाकार घेतला आहे.

औद्योगिक संघटना, सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम, मोठे उद्योजक, बँकर यांच्या औद्योगिक गुंतवणूक परिषदेत विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या उपस्थितीत उद्योजकांसमवेत करार बुधवारी करण्यात आले. अर्चना कोठारी, प्रशांत गिरबने, आर. सी. जायभाय, जितेंद्र डुडी, शैलेश राजपूत, विक्रांत बगाडे या वेळी उपस्थित होते.

**गिरबने यांचा प्रस्ताव मान्य**

'पुण्यात गुंतवणूक करू इच्छिणारे मराठा चेंबर्सच्या संपर्कात असतात. आम्ही त्यांना पुण्यातील गुंतवणूक कशी फायद्याची आहे, हे समजून सांगतो. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांची यात पुढाकार घेऊन दूरदृश्य प्रणालीद्वारे गुंतवणूकदारांना पायाभूत सुविधा, परवाने यासाठी आश्वासित करणे आवश्यक आहे,' असे मराठा चेंबरचे महासंचालक गिरबने यांनी सांगितले. त्यावर गुंतवणुकदारांना प्रशासनाकडून काही ग्वाही, आश्वासन हवे असल्यास मला कळवावे, मी स्वतः त्यांना भेटून त्यांच्या समस्या दूर करीन आणि गुंतवणूक करण्याबाबत आश्वस्त करीन, अशी ग्वाही जिल्हाधिकारी डुडी यांनी या वेळी दिली.

राजपूत म्हणाले, 'पुण्यात सात हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असून ४५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत. त्यानुसार १७२ करार करण्यात आले आहेत. मैत्री २.० संकेतस्थळाच्या माध्यमातून उद्योगांना राज्य सरकारच्या २५ खात्यांच्या ८२ सेवा ऑनलाइन मिळणार आहेत. पुणे जिल्ह्यातून एक लाख कोटी रुपयांची उत्पादने निर्यात झाली असून यंदा त्यामध्ये दहा टक्क्यांची वाढ होईल.'

**दर दोन महिन्यांनी बैठक**

भारतात सर्वाधिक औद्योगिकीकरण हे पुण्यात होत आहे. पुण्यात गुंतवणूक केल्यास त्याचा फायदा उद्योगांसह येथील स्थानिक नागरिकांनादेखील होणार आहे. गुंतवणूक मोठ्या प्रमाणात येत असल्यास पायाभूत सुविधा वाढविण्याची शासनाची जबाबदारी आहे. या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून दर दोन महिन्यांनी उद्योगांची बैठक घेण्यात येईल. याकरिता खास समितीची स्थापना करण्यात आली असून, या बैठकीत कामगार, वीज, रस्ते, जमीन अशा समस्या उद्योगांनी मांडाव्यात. या समस्यांचे निराकरण पुढील बैठकीच्या आधी म्हणजेच दोन महिन्यांत केले जाईल; तसेच गुंतवणूकदारांनी काही सूचना केल्यास त्याचेही स्वागत केले जाईल, असे जिल्हाधिकारी डुडी यांनी या वेळी सांगितले.

औद्योगिक गुंतवणूक परिषदेत १७२ करार झाले असून, सात हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत आहे. दर वर्षी होणाऱ्या गुंतवणूक परिषदेत झालेल्या करारांची अंमलबजावणी होते त्याचा; तसेच उद्योजकांना येणाऱ्या अडचणी याचा त्रैमासिक आढावा घेतला जाईल, असे विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी या वेळी सांगितले. या परिषदेमध्ये उद्योजकांसाठी विविध प्रकारचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

Maharashtra Times 13.3.2025 P.no.3

गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी तसेच उद्योजकांसाठी  कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हातळण्यासाठी जिल्हयातील संबंधित यंत्रणा यांची मा. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षेतेखाली दि.२७/०३/२०२५ रोजी बैठक घेण्यात आलेली असून  दर दोन महिन्यांनी बैठक आयोजीत करण्यात येणार आहे.





सकाळ

# उद्योग क्षेत्राला सुविधा देण्यावर भर

## विभागीय आयुक्तांकडून आढावा

पुणे, ता. २७ : उद्योग संघटना आणि उद्योगांच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या समस्यांची तातडीने दखल घेण्यात येईल. समस्या संबंधित विभागाकडे पाठवून त्या त्यांच्या पातळीवर सोडविण्यात येतील, असे आश्वासन आज प्रशासनाकडून उद्योग क्षेत्राला देण्यात आले.

जिल्ह्यातील उद्योग संघटना आणि उद्योग प्रतिनिधींची बैठक मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरमध्ये (एमसीसीआयए) आयोजित करण्यात आली होती. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवड शहराचे अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी, पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी, 'एमसीसीआयए'चे महासंचालक प्रशांत गिरबने यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, "मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यांतर्गत राज्यात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित करण्याच्या दृष्टीने उद्योगांना सर्व ते सहकार्य तसेच सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश आहेत."

### टूल उद्योगांसाठी प्रयत्नशील : जिल्हाधिकारी

टूल बनविणारे लघुउद्योग हे मोठ्या उद्योगांसाठी पूरक तसेच कोणत्याही क्षेत्रासाठी महत्त्वाचे आहेत. ते विखुरलेले असल्याने त्यांना सुविधा पुरविण्यात येत असलेल्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने जागा तसेच अन्य सुविधा उपलब्ध करून त्यांचा समूह (क्लस्टर) विकसित करण्यासाठी आणि खासगी क्षेत्रातील उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठीही प्रयत्न करण्यात येतील, असे डुडी म्हणाले.

Pune, Main
28/03/2025 Page No. 102





प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भिड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com

# जिल्ह्यात उद्योग येण्यासाठी प्रयत्न

- विभागीय आयुक्तांची ग्वाही : उद्योजकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत बैठक

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्यात उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्याचे राज्य शासनाचे धोरण असून जिल्ह्यामध्ये अधिकाधिक आणि विविध क्षेत्रातील उद्योग यावेत, यासाठी प्रशासनातर्फे निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिली. उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध प्रशासकीय विभागांनी सामूहिक दृष्टिकोन ठेवून एकत्रित प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांसोबत उद्योजकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरच्या सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या वेळी पुणे मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी चिंचवड शहराचे अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी, पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांसोबत उद्योजकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत घेतलेल्या बैठकीत उपस्थित अधिकारी.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यांतर्गत राज्यात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित करण्याच्या दृष्टीने उद्योगांना सर्व ते सहकार्य तसेच सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश आहेत. त्यासाठी उद्योजकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या दृष्टीने दर दोन महिन्याला बैठक आयोजित करण्यात येत आहे. या बैठकीत उद्योजकांनी मांडलेल्या समस्या, अडचणींवर चर्चा केली जात असून संबंधित विभागांनी पुढील बैठकीपूर्वी त्यावर कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

उद्योगांना वीज, पाणी, रस्ते आदी पायाभूत सुविधा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने प्राधान्याने द्याव्यात. त्यासाठी प्रस्ताव मंजुरी, निधीबाबतचे शासनाच्या पातळीवरील मंजुरीचे प्रश्न सोडविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. महावितरणने अखंडित वीजपुरवठ्यासाठी फीडर, उपकेंद्रे, वीज वाहिन्या आदी यंत्रणा अद्ययावत कराव्यात. औद्योगिक वसाहतीतील रस्ते निर्मिती व दुरुस्तीला एमआयडीसीने गती द्यावी. या प्रस्तावांच्या मंजुरीसाठी प्रयत्न करू.

बैठकीला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, माथाडी कामगार मंडळ, कामगार विभाग, पोलिस, जिल्हा परिषद आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

My Pune Edition
Mar 28, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

# १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम

## ९. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI and Use of Artificial Intelligence Technology (AI)) (Officers- Staff Training. Service Related)

| अ.क्र. | निकष | तपशिल | |
|---|---|---|---|
| इ | कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे |  | कार्यालयामध्ये सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दि.११/०४/२०२५ रोजी प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच कार्यालयीन कामकाज अचूक होण्यासाठी चॅट जीपीटीचा वापर करण्यात येत आहे. |

# १०. नाविन्यपूर्ण उपक्रम (Innovative Initiatives)

## निर्यात उद्योग घटकांना निर्यातीबाबत माहिती व प्रशिक्षण शिबिर, चाकण ता.खेड











# जिल्हा गुंतवणूक परिषद-2025 पुणे





# जिल्हा गुंतवणूक परिषद

लोकसत्ता

## पुण्यात सात हजार कोटींची गुंतवणूक

### औद्योगिक गुंतवणूक परिषदेत १७२ करारांवर स्वाक्षरी; ५० हजार रोजगारनिर्मिती शक्य

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

पुणे : पुण्यात ७ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक होणार असून, यासाठीचे १७२ करार बुधवारी करण्यात आले. यात ५० लाख ते १ हजार ५०० कोटी रुपयांपर्यंतच्या गुंतवणूक करारांचा समावेश आहे. या गुंतवणुकीमुळे ५० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत.

औद्योगिक संघटना, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम, मोठे उद्योजक, बँकर्स यांच्या औद्योगिक गुंतवणूक परिषदेत हे करार करण्यात आले. या वेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज अँण्ड अॅग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) महासंचालक प्रशांत गिरबने, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे कार्यकारी संचालक विक्रांत बगाडे, जिल्हा उद्योग केंद्राच्या सरव्यवस्थापिका अर्चना कोठारी आदी उपस्थित होते. याप्रसंगी काही प्रमुख गुंतवणूकदारांचा प्रातिनिधिक स्वरुपात सत्कार करण्यात आला.

या वेळी बोलताना विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले की, पुणे विभागात उद्योगांच्या पायाभूत सुविधांच्या अडचणी, असामाजिक तत्त्वांकडून येणारे अडथळे या अनुषंगाने उद्योगांशी संवाद साधण्यासाठी प्रशासन कायम उपलब्ध असून, दर तीन महिन्यांनी उद्योगांसोबत आढावा घेण्यात येईल.

प्रशांत गिरबने म्हणाले, 'देशाच्या एकूण निर्यातीत पुणे जिल्हा हा पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये समाविष्ट असून, अभियांत्रिकी निर्यातीमध्ये प्रथम क्रमांकावर आहे. राज्यात येणाऱ्या परकीय गुंतवणुकीतही पुणे जिल्ह्याचा मोठा वाटा आहे. चेंबर तसेच सदस्य उद्योगांच्या वतीने इलेक्ट्रॉनिक वाहने धोरण तसेच नवीन औद्योगिक धोरणासाठी उपयुक्त सूचना देण्यात येतील. जिल्ह्यात येणाऱ्या गुंतवणूकदारांना विश्वास वाटेल असे वातावरण तयार करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करूया.'




औद्योगिक गुंतवणूकदार परिषदेत विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी बुधवारी मार्गदर्शन केले.

जिल्ह्यामध्ये अधिकाधिक औद्योगिक गुंतवणूक व विकास व्हावा यासाठी उद्योगस्नेही धोरण राबविण्यात येत आहे. उद्योगांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यालाही प्रशासनाचे उच्च प्राधान्य असून, कोणत्याही घटकाकडून त्रास होत असल्यास उद्योगांनी खुलेपणाने, निर्भिडपणे त्याची माहिती द्यावी.
– डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त

#### 'समृद्धी'च्या धर्तीवर पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन

जिल्ह्यात विकसित होत असलेला बाह्य वर्तुळाकार मार्ग तसेच अन्य सुविधांमुळे बाह्य क्षेत्रातही उद्योग विकासाला चालना मिळणार आहे. पुरंदर येथील विमानतळाच्या अनुषंगाने अधिसूचना निघताच तत्काळ समृद्धी महामार्ग तसेच पुणे बाह्य वर्तुळाकार मार्गाच्या धर्तीवर जलद भूसंपादन करण्यात येईल. त्याशिवाय पुणे विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाच्या कामालाही लवकरच गती मिळणार आहे. पुणे शहरातील एकात्मिक वाहतूक आराखडा तयार करण्यात आला असून, अशा प्रकारे बाह्य व अंतर्गत वाहतूक कोंडीवर गतीने मार्ग काढण्याच्या उपाययोजना सुरू आहेत, असे विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले.

#### पुढील महिन्यात अॅग्री हॅकॅथॉन

पुढील महिन्यात प्रशासन देशात पहिल्यांदाच नावीन्यपूर्ण अशी पुणे अॅग्री हॅकॅथॉन आयोजित करण्यात येणार असून, यासंदर्भात देशात कृषीमध्ये होत असलेले नवीन संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान निर्माण करत असलेल्या मोठ्या उद्योगांसोबतच नवकल्पनांच्या माध्यमातून नवउद्यम (स्टार्टअप) स्थापन करणाऱ्यांनाही बोलावण्यात येणार आहे. या सर्वांना त्यांचे तंत्रज्ञान दाखविण्याची संधी मिळणार असून, ते प्रत्यक्ष शेतीपर्यंत कसे जाईल यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

Loksatta 13.3.2025 P.no.3

## सात हजार कोटींची गुंतवणूक

### औद्योगिक गुंतवणूक परिषदेत १७२ करार; ४५ हजार रोजगार निर्माण होणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे जिल्ह्यात सात हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, विविध कंपन्यांशी १७२ करार करण्यात आले आहेत. या माध्यमातून ४५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

औद्योगिक संघटना, सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम, मोठे उद्योजक, बँकर यांच्या औद्योगिक गुंतवणूक परिषदेत बुधवारी हे करार करण्यात आले. विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, महाराष्ट्र सेंटर फॉर आंत्रप्रेन्युरशिप डेव्हलपमेंटचे कार्यकारी संचालक विक्रांत बगाडे, पोस्ट मास्तर जनरल आर. सी. जायभाय, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे महासंचालक प्रशांत गिरबने, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी यांच्यासह विविध उद्योजक या वेळी उपस्थित होते. या परिषदेमध्ये पुण्यातून सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम आणि मोठे उद्योजक यांनी गुंतवणूक करण्याकरिता पुढाकार घेतला आहे.

राजपूत म्हणाले, 'पुण्यात सात हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असून ४५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत. त्यानुसार १७२ करार करण्यात आले आहेत. मैत्री २.० संकेतस्थळाच्या माध्यमातून उद्योगांना राज्य सरकारच्या २५ खात्यांच्या ८२ सेवा ऑनलाइन मिळणार आहेत. पुणे जिल्ह्यातून एक लाख कोटी रुपयांची उत्पादने निर्यात झाली असून यंदा त्यामध्ये दहा टक्क्यांची वाढ होईल.'




औद्योगिक संघटना, सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम, मोठे उद्योजक, बँकर यांच्या औद्योगिक गुंतवणूक परिषदेत विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या उपस्थितीत उद्योजकांसमवेत करार बुधवारी करण्यात आले. अर्चना कोठारी, प्रशांत गिरबने, आर. सी. जायभाय, जितेंद्र डुडी, शैलेश राजपूत, विक्रांत बगाडे या वेळी उपस्थित होते.

#### दर दोन महिन्यांनी बैठक

भारतात सर्वाधिक औद्योगिकीकरण हे पुण्यात होत आहे. पुण्यात गुंतवणूक केल्यास त्याचा फायदा उद्योगांसह येथील स्थानिक नागरिकांनादेखील होणार आहे. गुंतवणूक मोठ्या प्रमाणात येत असल्यास पायाभूत सुविधा वाढविण्याची शासनाची जबाबदारी आहे. या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून दर दोन महिन्यांनी उद्योगांची बैठक घेण्यात येईल. याकरिता खास समितीची स्थापना करण्यात आली असून, या बैठकीत कामगार, वीज, रस्ते, जमीन अशा समस्या उद्योगांनी मांडाव्यात. या समस्यांचे निराकरण पुढील बैठकीच्या आधी म्हणजेच दोन महिन्यांत केले जाईल; तसेच गुंतवणूकदारांनी काही सूचना केल्यास त्याचेही स्वागत केले जाईल, असे जिल्हाधिकारी डुडी यांनी या वेळी सांगितले.

औद्योगिक गुंतवणूक परिषदेत १७२ करार झाले असून, सात हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत आहे. दर वर्षी होणाऱ्या गुंतवणूक परिषदेत झालेल्या करारांची अंमलबजावणी होते त्याचा; तसेच उद्योजकांना येणाऱ्या अडचणी याचा त्रैमासिक आढावा घेतला जाईल, असे विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी या वेळी सांगितले. या परिषदेमध्ये उद्योजकांसाठी विविध प्रकारचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

#### गिरबने यांचा प्रस्ताव मान्य

'पुण्यात गुंतवणूक करू इच्छिणारे मराठा चेंबर्सच्या संपर्कात असतात. आम्ही त्यांना पुण्यातील गुंतवणूक कशी फायद्याची आहे, हे समजून सांगतो. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांची यात पुढाकार घेऊन दूरदृश्य प्रणालीद्वारे गुंतवणूकदारांना पायाभूत सुविधा, परवाने यासाठी आश्वासित करणे आवश्यक आहे,' असे मराठा चेंबरचे महासंचालक गिरबने यांनी सांगितले. त्यावर गुंतवणुकदारांना प्रशासनाकडून काही ग्वाही, आश्वासन हवे असल्यास मला कळवावे, मी स्वतः त्यांना भेटून त्यांच्या समस्या दूर करीन आणि गुंतवणूक करण्याबाबत आश्वस्त करीन, अशी ग्वाही जिल्हाधिकारी डुडी यांनी या वेळी दिली.

Maharashtra Times 13.3.2025 P.no.3

लोकमत

## उद्योगांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी प्रशासन देणार प्राधान्य

### विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : 'जिल्ह्यामध्ये अधिकाधिक औद्योगिक गुंतवणूक व विकास व्हावा यासाठी उद्योगस्नेही धोरण राबविण्यात येत आहे. उद्योगांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यालाही प्रशासनाचे उच्च प्राधान्य असून कोणत्याही घटकांकडून त्रास होत असल्यास उद्योगांनी खुलेपणाने, निर्भिडपणे त्याची माहिती द्यावी,' असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.

मराठा चेंबर येथे आयोजित औद्योगिक संघटना, सूक्ष्म, लघू व मध्यम व मोठे उद्योजक, बँकर्स यांच्या औद्योगिक गुंतवणूक परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, मराठा चेंबरचे महासंचालक प्रशांत गिरबाने, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे एमडी विक्रांत बगाडे, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी उपस्थित होते.

पुलकुंडवार म्हणाले, 'महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा (मैत्री २.०) पोर्टल या एकाच व्यासपीठावरून उद्योगांना सर्व परवानग्या, सुविधा देण्याची व्यवस्था तयार करण्यात आली असून त्यामुळे गुंतवणुकीला व उद्योग उभारणीला चालना मिळणार आहे. विभागात उद्योग उभारणी, त्यांच्या पायाभूत सुविधांच्या अडचणी, असामाजिक तत्वांकडून येणारे अडथळे याबाबत चर्चा होईल.

#### बाह्य वर्तुळाकार मार्गाची सुविधा

आता खासगी क्षेत्रात उद्योग उभारणीला चालना देणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्ह्यात खासगी क्षेत्रातही रस्ते, पाणी आदी पायाभूत सुविधा चांगल्या उपलब्ध आहेत. त्या अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या धोरणात्मक सुधारणांच्या अनुषंगाने सरकारकडे प्रयत्न करण्यात येतील.' जिल्ह्यात विकसित होत असलेला बाह्य वर्तुळाकार मार्ग तसेच अन्य सुविधांमुळे बाह्य क्षेत्रात विकासाला चालना मिळणार आहे. पुरंदर विमानतळाबाबत अधिसूचना निघताच पुणे बाह्य वर्तुळाकार मार्गाच्या धर्तीवर गतीने भूसंपादन केले जाईल.

#### उद्योजकांना विश्वास देण्यात येणार

डुडी म्हणाले, 'प्रशासन उद्योजकांसोबत आहे, असा विश्वास देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. मुख्यमंत्र्यांकडून उद्योगांना सहकार्याचे निर्देश असून त्यादृष्टीने जिल्हा पातळीवर एक समिती कार्यरत आहे. या समितीची दर दोन महिन्याला बैठक घेऊन उद्योगांना त्यासाठी आमंत्रित करण्यात येईल तसेच त्यांना आवश्यक जागा, वीज, पाणी, मनुष्यबळ आदींच्या दृष्टीने त्यांच्या अडचणी, समस्या गतीने सोडवण्यात येणार आहेत.

Pune Main
Page No. 2 Mar 13, 2025
Powered by: erelego.com

## जिल्ह्यातील उद्योगांना सुरक्षा प्रधान करण्यास प्राधान्य : विभागीय आयुक्त

पुणे : जिल्ह्यामध्ये अधिकाधिक औद्योगिक गुंतवणूक व विकास व्हावा यासाठी उद्योगस्नेही धोरण राबविण्यात येत आहे. उद्योगांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी प्रशासनाचे उच्च प्राधान्य असून कोणत्याही घटकांकडून त्रास होत असल्यास उद्योगांनी निर्भिडपणे त्याची माहिती घ्यावी, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले आहे.

एमसीसीआयए येथे आयोजित औद्योगिक संघटना, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम, मोठे उद्योजक, बँकर्स यांच्या औद्योगिक गुंतवणूक परिषदेत ते बोलत होत. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, मराठा चेंबर्स महासंचालक प्रशांत गिरबाने, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे कार्यकारी संचालक विक्रांत बगाडे जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी यावेळी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, देश आणि राज्याच्या विकासाला व अर्थव्यवस्थेला गती देण्याचे काम उद्योग क्षेत्र करते. राज्यात अधिकाधिक गुंतवणूक यावी यासाठी उद्योगांना सर्व ते सहकार्य करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश असून त्यासाठी शासन काम करत आहे. महाराष्ट्र उद्योग व्यापार आणि गुंतवणूक सुविधा (मैत्री २.०) पोर्टल या एकाच व्यासपीठावरून उद्योगांना सर्व परवानग्या, सुविधा देण्याची व्यवस्था तयार करण्यात आली असून त्यामुळे गुंतवणुकीला व उद्योग उभारणीला चालना मिळणार आहे.

जिल्ह्यात विकसित होत असलेल्या बाह्य वर्तुळाकार मार्ग तसेच अन्य सुविधांमुळे बाह्य क्षेत्रातही उद्योग विकासाला चालना मिळणार आहे. पुरंदर येथील विमानतळाच्या अनुषंगाने अधिसूचना निघताच तात्काळ समृद्धी महामार्ग तसेच पुणे बाह्य वर्तुळाकार मार्गाच्या धर्तीवर गतीने भूसंपादन करण्यात येईल. त्याशिवाय पुणे विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाच्या कामालाही लवकरच गती मिळणार आहे. असेही डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले.

Kesari 13.3.2025 P.no.2






# बीएफसी

- पुणे जिल्हयासाठी जिल्हा उद्योग केंद्र, पुणे यांचेमार्फत उद्योजकांना एक छत्राखाली सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी Business Facilation Cell उभारण्यासाठीचा प्रस्ताव उद्योग संचालनालयास सादर करण्यात आलेला आहे.

# धन्यवाद